**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**

नगरसचिव विभाग

प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ६४ विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - २०७** **दिनांक – १०/१०/२०२५**

**विभाग – विद्दुत विभाग**

---

प्रस्तावाचा विषय – अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीमधील महत्वाच्या विविध चौकांमध्ये नवीन वाहतूक नियंत्रक सिग्नल यंत्रणा बसविणेबाबत तसेच काही चौकांमधील जुने वाहतूक नियंत्रक सिग्नल दुरूस्त करून कार्यान्वित करणेबाबत.

--**--

ठराव – विभागाने प्रस्ताव सादर केल्यानुसार, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीमध्ये सद्दस्थितीत एकूण १४ वाहतूक नियंत्रक सिग्नल आहेत. अहिल्यानगर महानगरपालिका विद्युत विभागाकडे सिग्नल बाबत देखभाल दुरूस्ती करणारे कोणीही माहितगार सक्षम तांत्रिक अधिकारी / कर्मचारी उपलब्ध नसल्यामुळे शहरातील एखाद्या ठिकाणचे सिग्नल नादुरूस्त झाल्यास ते तातडीने दुरूस्त करणे गरजेचे असते, वेळेत त्याची दुरूस्ती केली नाही तर शहरामध्ये मोठी वाहतूक कोंडी होवून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यानुसार अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीमधील महत्वाच्या विविध चौकांमध्ये नवीन वाहतूक नियंत्रक सिग्नल यंत्रणा बसविणे गरजेचे आहे तसेच काही चौकांमधील जुने वाहतूक नियंत्रण सिग्नल दुरूस्ती करून कार्यान्वित करणे आवश्यक आहे.

प्रस्तावामध्ये नमुद महानगरपालिका हद्दीतील एकुण १४ सिग्नल असुन त्यातील काही नविन वाहतुक नियंत्रक सिग्नल यंत्रणा बसविणे व जुने वाहतुक नियंत्रक सिग्नल दुरूस्त करणे या कामाचे अंदाजपत्रक तयार करणे करिता महाराष्ट्र शासनाचे PWD – CSR चे दर उपलब्ध नसल्याने सिग्नल चे काम करणा-या संस्थेकडुन कोटेशन मागुन अंदाजपत्रक तयार करणे गरजेचे आहे. त्यानुसार कोटेशन मागविणे करिता नोटीस प्रसिध्द करण्यात आली त्यानुसार दिनांक.१२/०९/२०२५ ते १८/०९/२०२५ या कालावधीत कोटेशन मागविण्यात आले असता १) मे व्ही एस ऍटरप्राईजेस पुणे २) मे. जेपी. ट्राफिक ऑटोमेशन पुणे ३) मे. जेपी. ट्रोनिक्स सिस्टम पुणे याचे दर प्राप्त झाले असुन त्याचे दर खालील प्रमाणे आहेत.

| Sr. No. | Signal Address | Remarks | JP Tronics Systems | VS Enterprises | JP Traffic |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Kinetic chowk | Repariring | 58250.00 | 59150.00 | 50500.00 |
| 2 | Sukkar Chowk | Repariring | 146400.00 | 125250.00 | 99544 |
| 3 | Swastik Chowk | Repariring | 227390.00 | 216830.00 | 181639 |
| 4 | Chhatrapti shiv aji mahraj chowk | Repariring | 188390.00 | 170380.00 | 133239 |
| 5 | Maliwada bus stand chowk | Repariring | 134390.00 | 117580.00 | 91839 |
| 6 | Market yard chowk | Repariring | 549840.00 | 502360.00 | 398309 |
| 7 | Chandni chowk | Repariring | 190140.00 | 172230.00 | 134325 |
| 8 | Sbi chowk GPO chowk | Repariring | 185000.00 | 152150.00 | 121600 |
| 9 | Ekvira chowk | Repariring | 273100.00 | 257400.00 | 221400 |
| 10 | Bhistbag chowk | Repariring | 270475.00 | 254550.00 | 219150 |
| 11 | DSP chowk | New | 2785155.00 | 271715.00 | 2481020 |
| 12 | Patrakar chowk | New | 2104915.00 | 2063955.00 | 1880866 |
| 13 | Premadan chowk | New | 2770410.00 | 2703015.00 | 2476970 |
| 14 | Nagapur petrol pump MIDC | New | 2112280.00 | 2070955.00 | 1887116 |
| | | Total | 11996135 | 11582820 | 10377517 |
| | | | जास्त | जास्त | कमी |

वरील दराचा तुलनात्क तक्ता पाहता त्यामध्ये मे.जे.पी. ट्राफीक ऑटोमेशन प्रा. लि., मोशी, पुणे यांचे दर सर्वात कमी आहे त्यानुसार मे.जे.पी. ट्राफीक ऑटोमेशन प्रा. लि., मोशी, पुणे

सदर कामाचे अदांजपत्रक बाजारातुन दरपत्रके प्राप्त करून घेवुन सर्वात कमीचे दरानुसार सदर कामाच्या रकमा अंदाजपत्रकात घेण्यात आलेल्या आहेत तसेच ज्या विद्युत साहित्याचे दर सुचीमध्ये उपलब्ध आहेत अश्या साहित्याचे दर अंदाजपत्रकात सामाविष्ट केलेले असून सदरील कामाचे अंदाजपत्रकात मा. शहर अभियंता यानी खालील प्रमाणे मान्यता प्रधान केलेली आहे.

| अ.नं. | कामाचे नाव | तांत्रिक मान्यता क्रमांक व दिनांक | रक्कम रूपये |
|---|---|---|---|
| 1 | अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील महत्वाच्या विविध चौकांमध्ये नवीन वाहतूक सिग्नल नियंत्रक यंत्रणा बसविणेबाबता तसेच काही घोकांमध्ये जुने वाहतूक नियंत्रक सिग्नल दुरूस्त करून कार्यान्वित करणेबाबत | सार्व. बां. वि. जा.क्र. २०४९/२०२५२६ दि.०९/१०/२०२५ | रू.१,३७,५१,१३३/- |

प्रस्तावामध्ये नमुद महानगरपालिका हद्दीतील एकुण १४ सिग्नल असुन त्यातील काही नविन वाहतुक नियंत्रक सिग्नल यंत्रणा बसविणे व जुने वाहतुक नियंत्रक सिग्नल दुरूस्त करणे कामाचा प्रस्ताव नागरी दलितेतर वस्ती सुधार योजना या योजनेतुन मंजुर करणे बाबत तांत्रिक अंदाजपत्रक मा. जिल्हाअधिकारी ( नियोजन ) अहिल्यानगर यांच्याकडेस पाठविण्यास मा. प्रशासक सर्व साधारण सभा मजूरी देत आहे.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

( सही )
( मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

( सही )
( यशवंत डांगे )
प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका